# Literature and Arts for Peace and Humanity

## Research Papers Presented in the INNSÆI LIT Fest, Goa 2022

**Chief Editors**

Dr Tejaswini Patil Dange

Mr Orbindu Ganga

**Executive Editors**

Ms. Aditi Barve

Dr Janatha Ramanathan (English)

Dr Purnanand Chari (Konkani)

Dr Rupa Chari (Hindi)

Hemant Aiya (Marathi)

**Compiler & Editor**

Ms. Sweta Kumari

# Literature and Arts for Peace and Humanity

## Research Papers Presented in the INNSÆI LIT Fest, Goa 2022

**Chief Editors**
Dr Tejaswini Patil Dange
Mr Orbindu Ganga

**Executive Editors**
Ms. Aditi Barve
Dr Janatha Ramanathan (English)
Dr Purnanand Chari (Konkani)
Dr Rupa Chari (Hindi)
Hemant Aiya (Marathi)

**Editor and Compiler**
Ms. Sweta Kumari

## All Rights Reserved

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of all the writers of this community. All rights reserved no part of this book may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted, in any form by any means, electronic, mechanical, magnetic, optical, chemical, manual photocopying, recording or otherwise, without the prior written consent of its writer.

**Book**: Research Papers Anthology First Edition
**Published:** Notion Press May 2023
**Copyright** © 2023
**Book Formatting**: Sweta Kumari
**Cover Design**: Sweta Kumari

# INDEX


| S.N. | Paper Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | The Eye That Looks at The World and The Hand That Writes About It: The Civilizational and Humanistic Role of Literature | Ligia Tomoiaga | 1 |
| 2 | Enheduanna: The First Poetic Voice in The History of Mankind | Lucilla Trapazzo | 18 |
| 3 | The Psycho-social crisis of Indian Transgenders: An Analytical Study of Manobi Bandyopadhyay's *A Gift of Goddess Lakshmi* | S. Anushya | 36 |
| 4 | Towards Understanding Research Ethics in Humanities: A Study specific to Creativity in Literary Research | Debdoot Mukherjee | 50 |
| 5 | Going Beyond 'Selves': Auto-ethnographic tone depicted in The Weave of My Life by Urmila Pawar | Dr. Mansi Chauhan | 66 |
| 6 | Analysis of Delusion in Christopher Priest's *The Affirmation* | Anita M. Powar and Dr. Kalpana Girish Gangatirkar | 76 |
| 7 | Psychology and Literature: Therapeutic Spark and Combustion | Dr. Devyani Chaube | 86 |
| 8 | Portrayal of Uncivilized Barbarian in Daya Pawar's *Baluta* | Dr. D. N. Patil | 96 |
| 9 | Mahatma Gandhiji's *The Story of My Experiments with Truth*: Fast as Weapon against British Government | Dr. Ujwala Vijay Patil | 114 |
| 10 | Exploration of Self and Milieu in R K Narayan's My Dateless Dairy | Dr Shweta Singh | 124 |
| 11 | Prayers to Lord Murugan: A Modern Prayer by A.K. Ramanujan | Smt. Jayshri Ganpati Patil and Dr Tejaswini Patil Dange | 134 |
| 12 | A Critical Appreciation of The Bhakti Movement In Maharashtra | Dr.Pradnyashailee Bhagwan Sawai | 146 |
| 13 | Psychological Impact of Power Shift in Nadine Gordimer's July's People | Mrinal Mudgil and Dr Lalita Gaur | 162 |
| 14 | Analysis of The Aspects of Spirituality in The Novels *The Guide* And *Journey To Ithaca* | Rameshwari A Kudale and Dr. Kalpana Girish Gangatirkar | 182 |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | Tukaram's Poetry: A Source of Morality and Worldly Wisdom | Dr. Sanjeev Kondekar | 192 |
| 16 | The Themes of Peace and Humanity in Marathi Saints' Literature | Dr Indrayani Kuduchkar – Jadhav | 208 |
| 17 | Importance of Gender Equality for Social Harmony with Special Reference to Sudha Murthy's 'Gently Falls the Bakula' | Ms. Prajakta N. Dagade and Ms. Megha M. Gavade | 218 |
| 18 | Decolonization of English Literature in India: A Way to a Better Education | Tahenaz Biva | 226 |
| 19 | Humanism and Peace in Martin Luther King, Jr's I Have a Dream | Shubhangi Nivrutti Lavate | 238 |
| 20 | Ecocritical reading of Hema and Kaushik story in *Unaccustomed Earth* | Joyoti Das. | 248 |
| 21 | Yearning for Peace: Message from Shiv K Kumar's *A River with Three Banks* | G. Jeevitha and Dr. Sheeba S. Nair | 260 |
| 22 | Reflections of Violation of Human Values and Peace of Mind in Mahesh Dattani's Play 'Dance Like a Man' | Dr. Sunanda S. Shelake | 270 |
| | **Marathi Section** | | |
| 1 | संत वाङ्मय मानवता व शांती | डॉ. सुनीता उमस्कर | 278 |
| 2 | तुकारामांच्या अभंगांतील मानवता | कु. दिव्या चंद्रेकर | 286 |
| 3 | मराठी कवितेतील मानवता आणि शांती | प्रा. हेमंत अय्या | 292 |
| 4 | गोमंतकीय कुळमी लोककथांतून आविष्कृत होणारी मानवता | प्रा. जयेश गावकर | 302 |
| 5 | मराठी नाट्यवाङ्मय: मानवता व शांती | श्री. अभिषेक राजेंद्र परब | 308 |
| | Konkani Section | | |
| 1 | पुंडलीक नायक हांच्या मुठय कथा संग्रहांतलो ग्रामीण समाज आनी मानवीय संवेदना. | नरेश चं. नायक | 316 |
| | Hindi Section | | |
| 1 | राजेश जोशी की कविताओं में व्यक्त मानवीय मूल्य | उल्का कालेकर | 328 |

## Chapter-IV

# गोमंतकीय कुळमी लोककथांतून आविष्कृत होणारी मानवता

जयेश गावकर

## प्रस्तावना-

भारतात लोकगीतांप्रमाणेच लोककथांनाही अतिप्राचिन परंपरा लाभलेली आहे. मौखिक आविष्काराचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे 'लोककथा' होय. लोकजीवनात लोककथांना विशेष महत्त्व आहे. लोककथा मौखिक पध्दतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित होत असते. लोककथा कथनामागची वेगवेगळी प्रयोजने आज आधोरेखित करता येतात. लोकांचे मनोरंजन करणे, विधीचा एक भाग असणे, संस्कृतीचा परिचय करून देणे, सांस्कृतिक इतिहास सांगणे अशी किती तरी प्रयोजने लोककथा कथनामागे असलेली आढळून येतात. या सगळयांबरोबर एक महत्त्वाचे प्रयोजन म्हणजे लोककथेतून नीति-अनीति विषयक शिकवण देणे. आशयानुसार कुळमी लोककथांचे अनेक प्रकार सांगता येईल. त्यांच्यात दैवतकथा, अद्भूतरम्यकथा, देवदेवता साहाय्यकथा, चातुर्यकथा असे वेगवेगळे कथाप्रकार आढळून येतात. या वेगवेगळ्या कथांतून दिसून येणाऱ्या मानवतेचा विचार या संशोधन लेखात करायचा आहे.

गोमंतकामध्ये वास्तव्य करणारी कुळमी ही अत्यंत महत्त्वाची लोकजमात आहे. गोमंतकीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी या जमातीचे महत्त्वाचे योगदान आहे. मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, प्रयोगसिध्द लोककला, लोकरूढी, विधि, समजूती इत्यादी लोकजीवनातील विशेष या जमातीत पहायला मिळतात. या जमातीच्या लोकवाङ्मयाचा वा शाब्द साहित्याचा विचार केल्यास लोकगीते (लग्नगीते, शिगम्याची गीते, धिल्लोगीते, धालोगीते, फुगडीगीते, जात्यावरील गीते, कांडणगीते, अंगाईगीते), लोककथा, लोककथागीते, म्हणी, कोडी, वाक्प्रचार इत्यादी वेगवेगळे लोकवाङ्मयाचे प्रकार कुळमी लोकांत आढळून येतात. त्यापैकी

लोककथा या प्रकाराचा विचार अभ्यासासाठी करायचा आहे. तसेच या लोककथांतून आविष्कृत होणाऱ्या मानवतेचा शोध पुढे घ्यायचा आहे.

### गोमंतकीय कुळमी जमात व लोककथा

मुळात कुळमी हा वेळीप आणि गावकर अशा दोन जात नामांमध्ये विभागलेला समाज आहे. जो गोमंतकाच्या सह्याद्रीच्या डोंगर माथ्यावर आणि पठारी प्रदेशात राहून कुमेरी पध्दतीने शेती करून आपले जीवन जगत आलेला आहे. हा समाज मुळात बळीवंशीय असून तो प्रोटो - ऑस्टोलॉईड वंशाशी संबधित आहे. गोमंतकामध्ये ही जमात मोठ्या प्रमाणात काणकोण, केपे, सांगे तालुक्यात पहायला मिळते.

कुळमी जमातीच्या लोककथेचा विचार केल्यास लोककथा सांगण्याची पूर्वापार परंपरा त्यांच्यात आहे. तरीही एक विशेष म्हणजे या जमातीत पिकेच्या वेळेवर कथा सांगितल्या जात नाही. 'पिकेर काणी सांगल्यार भिक नागता' असा समज त्यांच्यात आहे. म्हणजेच श्रावण भाद्रपद महिन्यात कथा सांगितल्या जात नाही. कारण या महिन्यात शेत पसवतात (कणसांना भात यायला सुरूवात होते). फक्त कथा ऐकत व सांगत राहिलात तर व्यवहाराकडे दुर्लक्ष होईल. शेतकाम बरोबर न झाल्यामुळे तोटा होईल . परिणामी भिक लागेल. इथे त्यांची व्यवहारविषयक दूरदृष्टी दिसून येते.

कुळमी लोककथेची अनेक वैशिष्ट्ये आहे. त्यापैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लोककथेतून आविष्कृत होणारी मानवता. याच अनुषंगाने पुढे विचार करावयाचा आहे. मानवता म्हणजे काय? हे शिक्षित लोकांनाच नव्हे तर अशिक्षिताना म्हणजेच या लोकांनाही माहीत होते. आजची पिढी मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून संस्कारवर्गात पाठवतात. तशी सोय या लोकांमध्ये नाही. लोककथेतूनच मुलांवर व इतर लोकांवर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न केला जातो. नैतिक शिकवण, देव-देवतांच्या गोष्टी, समाजज्ञान, व्यवहारज्ञान, इत्यादी अनेक विषयांवरची माहिती मुलांना घर बसल्या त्यांना मिळते. तर हे संस्कार करणारे कोण? तर त्यांचे आई-वडिल, आजी-आजोबा, शेजारी – पाजारी इत्यादी. साहाजिकच हे संस्कार मनावर बिंबवण्याचे माध्यम म्हणजे लोककथा. या लोककथा 'पल्ली'समोर (शेकोटी) सांगितल्या जायच्या. कथा संपल्यानंतर "काणी सोरो आनी पोट भरो" असे म्हटले जाते. लोककथेतून फक्त मनोरंजन व्हावे इथपर्यंत त्यांच्या कथा मर्यादित राहिलेल्या दिसत नाही. तर त्यापुढे जाऊन

नीति-अनीति विषयक शिकवणही मुलांना कथेच्या माध्यमांतून ते देतात. तर या लोककथांतून आविष्कृत होणारी मानवता याचा विचार पुढे करूया.

**लोककथेतून दिसणारी 'न्यायवृत्ती'**

एक विशेष कथा या जमातीत आढळून येते त्या लोककथेचे नाव म्हणजे 'जानकापूर राजा'. या लोककथेत राणी आपल्या माहेरी जाते. संध्याकाळपर्यंत ती घरी पोहचत नाही. तिच्या शोधात तिचा नवरा जानकापूराजा माहेरी जाण्यास निघतो. वाटेत जात असताना कोल्हा राजाला हाक मारतो. कोल्ह्याने हाक मारणे म्हणजे अपशकून, या धारणेपायी राजा पुढे जात नाही. बाजूच्या गोठ्यात घोड्याला बांधून राजा झोपतो. सकाळी गवळ्याचा (धनगराचा) मुलगा दुध काढण्यासाठी गोठ्यात येतो तेव्हा आपल्या म्हशीला घोडा झाला आहे असे त्याला वाटते. राजा सांगतो की हा माझा घोडा आहे आणि गवळी सांगतो माझ्या म्हशीला घोडा झालेला आहे. गावकरी राजाचे ऐकून घेत नाही. तेव्हा सत्य काय? आणि असत्य काय? हा ज्ञाय वा निर्णय करण्यासाठी कोल्ह्याला राजा बोलवून घेऊन येतो. तो शेवटचा संवाद पुढील प्रमाणे-

"ये कोल्या तु रजांव करू येलो न्हिदता कितें रे... कपला न्हिद न्हिदता रे तु?"
"आयकय रे.. आयकय रे सांगता कसली न्हिद न्हिदता ती"
"काल आनी पोयर दोन दिस आनी दोन राती जाल्यो दर्या उजो भरलो आनी म्हाका थिंगा पालोवक नायलो. म्हाका न्हिद ना, भूक नागून सामको जाम जालो हांव."
"हो मेलो रे दर्या उजो भरतोलो. दर्या न्ही उजो भरता न्हु. कोण सांगता?"
"तुजेर हांव एक नायतोलो म्हशीगेर घोडो जाता न्हु कोणी सांगले तुका. दर्या उजो भरना म्हशीगेर घोडो जायना"
"राजा घोडो राजा मेळ्ळो रे"
"राजा घोडो राजा मेळ्ळो मु"

इथे कोल्हा झोप येण्याचे नाटक करतो. तेव्हा गावकरी त्यांना विचारतात तु ज्ञाय करण्यासाठी आलेला आहे की झोपायला?. तेव्हा कोल्हा सांगतो की काल आणि पर्वा समुद्राला आग लागली होती ती विझवण्यासाठी मी गेलो होतो. हे अवास्तव विधान गावकऱ्यांना पटत नाही व ते विचारतात समुद्राला कधी आग लागते? तेव्हा कोल्हा उत्तर देतो समुद्राला आग लागत नाही त्याचप्रमाणे म्हशीच्या पोटी घोड्याचा जन्म होत नाही. शेवटी कोल्हा ज्ञाय करतो व घोडा

राज्याच्या ताब्यात करतो. ही कथा काल्पनिक असली तरी, या कथेतून ज्ञायवृत्ती स्पष्टपणे दिसते. ज्या माणसाची एखादी वस्तू असेल तर ती वस्तू त्या माणसाला मिळायला पाहिजे. इथे शेवटी राजाला तो घोडा मिळाला. योग्य तो ज्ञाय झालाच पाहिजे अशी शिकवण ही कथा देते.

**लोककथेतून सकल जन सुख**

माणुसकी हा माणसाचा धर्म आहे. लोककथा आणि माणुसकी यामधला जर अनुबंध तपासून पाहिला तर लक्षात येते की जास्तीत जास्त कथा संपल्यानंतर शेवटी एक वाक्य म्हटले जाते. ते वाक्य माणुसकीच्या दृष्टीकोणातून महत्त्वाचे असल्याचे जाणवते. ते वाक्य पुढीलप्रमाणे-

“सगळे सुखी जाता! राज्य सुखी जाता! तशे तुमी आमी सुखी जावों!”

त्यांच्या जास्त तर कथा राजा, राज्य, राणी यावर आधालेल्या असतात. लोककथांचा जास्त असा शेवट सुखद असतो. सगळे सुरळीत झाल्यानंतर इथे सांगणारा वा कथन करणारा मी एकटाच सुखी होवो असे न म्हणता ‘आम्ही सुखी होवो’ अशा पध्दतीचे उद्गार काढतात. यावरून लक्षात येते की ते स्वतःचाच विचार करत नाही तर दुसऱ्यांचाही ते विचार करतात. सुखही सर्वासमवेत वाटून घ्यायला पाहिजे. सगळेजण सुखी व्हायला पाहिजे. असा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या लोककथेत दिसतो. स्वविचाराबरोबर इतरांचाही चांगला विचार करण्याची प्रेरणा कथा देते.

**आदरभाव आणि क्षमा-**

‘भिकशेन’ या कथेमध्ये राजा आपल्या जावयाला मारण्याचा प्रयत्न करतो पण त्या गडबडीत तो स्वतःच्या मुलाचा गळा कापतो. आता स्वतः जगून काहीच फायदा नाही असा विचार करत तो राजा स्वतःचा गळा कापून घेतो. हे दृश्य पाहून जावयाला खूप दुःख होते व तोही स्वतःला मारण्याचा प्रयत्न करतो.अशावेळी काकादेवी प्रसन्न होते व जावयाला वर मागायला सांगते. जावयाला धन, दागिने काहीही मागता आले असते. तरी तो ते मागत नाही. उलट आपल्या सासऱ्याला, मेव्हण्याला जीवंत करण्याचा वर मागतो. या कथेतून असा बोध मिळतो की ‘दुसऱ्यांनी कितीही आपले वाईट केले तरी आपण त्यांचे वाईट करू नये’. त्यांना क्षमा केली पाहिजे, सूड घेण्याची भावना मनात आणता कामा नये. असा संदेश ही कथा देते.

त्याचबरोबर याच कथेत वडिलधाऱ्या माणसांचा आदर कसा करावा हेही सांगितलेले आहे. जेव्हा सासरे जावयाचे पाय पडतो तेव्हा जावई सांगतो जे आधी झाले ते आपण विसरू व इथून

पुढे चांगलेपणाने वागू व राहू. तसेच तुम्ही वयाने मोठे आहात, तुम्ही जाणते आहात तेव्हा तुमच्याकडून आम्हाला शिकायचे आहे. इथे वापरलेली आदरपूर्वक भाषा, मोठ्यांनी लहानाना पाय पडायचा नाही इत्यादी संस्कार आपल्याला या कथेत दिसून येतात.

अशाचा आशयाची 'बेलावंत कन्या' म्हणून कथा येते. घरची सगळी मंडळी शेवटच्या पुत्राला व सुनेला घरातून बाहेर काढतात. ते घर सोडून दूर जातात व स्वतःचा संसार मांडतात. खूप धनी होतात. पण इकडे त्यांच्या घरात खायलाही काही राहत नाही. घरातील लोक भिक मागतात. एक दिवस भिक मागत ते यांच्या घरी पोहचतात. त्यांना बेलावंत कन्या चांगले जेवण करून वाढतात. त्यांनी आपल्याला घरातून बाहेर काढले म्हणून त्यांचा ती त्यांना वाईट करत नाही. उलट आजपासून आपण याच घरात एकत्र चांगल्या पध्दतीने राहूया अशा कोमल शब्दात ती बोलते. इथे क्षमा, आदरभाव, कुटुंबाविषयी प्रेम, आपुलकीची भावना दिसते.

**मातृ-पिता भक्ती-**

आई-वडिल आपल्या मुलांवर चांगले संस्कार करतात. त्याचबरोबर मुलाला जर काही झाले तर सर्वप्रथम दुःख आई-वडिलांना होते. 'भूजिंग बळ' या कथेतही पुत्राचे रूपांतर भूजंगात होते. तो पाताळात जातो. त्या भूजंगबाळाचा शोध घेण्यासाठी त्याची बायको पाताळात जाते. पाताळात भेट झाल्यानंतर भूजिंग त्याला विचारतो आई –वडिल कसे आहे? तेव्हा ते तुज्यासाठी शोक करत आहे असे ती त्याला सांगते. इथे मुलावर असलेल्या आई – वडिलांचे आतोनात प्रेम व मुलाचे आईवडिलांवर असलेले प्रेम या कथेत पहायला मिळते.

**समारोप**

कुळमी लोककथेतून मानवतेविषयीचे धागे दोरे आपल्याला पाहायला मिळतात. त्याचबरोबर लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम म्हणूनही लोककथांकडे पाहता येतात. मानवतेचे वेगवेगळे पैलू लोककथेत आढळून येतात. लोककथेतून ज्ञायवृत्ती,सकलजन सुख, आदरभाव आणि क्षमा, मातृ-पिता भक्ती, मार्गदर्शन-शिकवण इत्यादी. कुळमी कथा अद्भूतरम्यतेच्या पातळीवर वावरत असली तरी काही कथा नैतिक शिकवण देण्यासाठीच येतात याचा प्रत्यय प्रत्यक्ष श्रोत्यांस येतोच.

**निष्कर्ष-**

१. कुळमी लोककथेतून 'ज्ञायवृत्ती' दिसून येते.

२. स्वविचारांबरोबर इतरांचाही चांगला विचार करण्याची प्रेरणा कथा देते.
३. वडिलधाऱ्या माणसांचा आदर करणे व चुकलेल्यांना क्षमा करणे ही शिकवण कथा देते.
४. मातृप्रेम व पितृप्रेम याचे दर्शन कथा घडविते.

**संदर्भग्रंथ**

१. कालभूत पुरुषोत्तम 'लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन', विजय प्रकाशन नागपूर, २००७
२. नायक जयंती,गोवा कोंकणी अकादमी ,राजरत्नां , २००५

**व्यक्तीनाम सूची**

१. जानू भिकरो वेळीप– वय , ७५ वर्षे आसाळी काणकोण गोवा
२. दौपदी अर्जून गावकर – ६० वर्षे कर्वे गावडोंगरी काणकोण गोवा

**सहायक प्राध्यापक जयेश गावकर**
**मराठी अध्ययनशाखा, गोवा विद्यापीठ**
इमेल- jayeshgaonkar429@gmail.com
मो. नं. ९४२०६४०४५७

# Literature and Arts for Peace and Humanity

## About INNSÆI Journal:

Seeing an ambedo in the realm of life is a pursuit of search. The inquisitive creative mind wanders to make the ink to talk. Words need ink to be read and flown into many hearts. The choice of a word defines the state of mind and a passionate heart. Ink with a heart gives soul to the words. The world needs a phrontistery with a humane heart. Any project which is conceived with a good intention towards the betterment of the society has an impact on society. The IJCLPH provides a platform to spread peace with noble ink from the novice and literary luminaries. An ink can bring about changes which are far-reaching and influence a change in society. To be part of a literary journey which can influence and bring about changes towards peace and awareness in the society is a privilege. The IJCLPH provides a platform to share the literary prowess and a healthy ambiance for the literary commune to contribute to the society towards peace and humanity.

## About the Lit Fest:

Today's world is characterized by fear, anxiety, depression, hopelessness, and melancholy. It is surrounded by various kinds of fears - pandemic deaths, fear of war, our existence, and survival. On this backdrop, the only thing that uplifts human beings is PEACE. We need not only outer peace but also inner peace. Literature is the only thing that can provide peace in this new world of chaos. Since ancient times, literature has worked as a catalyst for peace-making and has been creating the ray of hope when the whole world is deconstructed. The prayers and prose have worked magic on the minds for ages. And it can be done only by literature. The only magic can be done through art and literature to change the world from melancholy to HOPE. This Conference and Lit Fest is a solemn attempt to meditate on how the urge for peace is presented in various forms of Art and Literature.



Dr Tejaswini Patil Dange
**Chief Editor**



Mr Orbindu Ganga
**Chief Editor**



Ms. Aditi Barve
**Executive Editor**



Dr Janatha Ramanathan
**Executive Editor**



Dr Purnanand Chari
**Executive Editor**



Dr Rupa Chari
**Executive Editor**



Dr Hemant Aiya
**Executive Editor**



Ms. Sweta Kumari
**Compiler & Editor**

***Awakening to the world of literature through our reflections...!***

Price Rs 550.00
979-889066064-0
9 798890 660640